नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - २६९ Issue - 269 | वार शनिवार दि. १५ फेब्रुवारी २०२५ Blow- Saturday Date 15 February 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# महाराष्ट्रात नवीन फौजदारी कायदे लागू करा

## केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचे निर्देश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : महाराष्ट्रातील सर्व पोलीस आयुक्त कार्यालयांमध्ये तीन नवे फौजदारी कायदे लागू करावेत, नवीन फौजदारी कायद्यानुसार महाराष्ट्र सरकारने अभियोग संचालनालय तयार करावे, असे आदेश केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी दिले. महाराष्ट्रात फौजदारी कायद्याच्या अंमलबजावणीबाबत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली एक आढावा बैठक घेण्यात आली. त्यावेळी ते बोलत होते. या बैठकीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते.

या बैठकीत राज्यातील पोलीस, कारागृह, न्यायालये, खटला आणि न्यायवैद्याक शास्त्राशी संबंधित विविध नवीन तरतुदींची अंमलबजावणी आणि सद्यास्थितीचा आढावा घेण्यात आला. मुख्यमंत्र्यांनी राज्यातील नवीन गुन्हेगारी कायद्यांच्या अंमलबजावणीचा द्वि-साप्ताहिक आढावा घ्यावा, तर मुख्य सचिव आणि पोलीस महासंचालकांनी साप्ताहिक आढावा घ्यावा, असे निर्देश शहा यांनी दिले. कायदा आणि सुव्यवस्था मजबूत करण्यासाठी गुन्हे नोंदवणे आवश्यक आहे, त्यामुळे एफआयआर दाखल करण्यात विलंब होता कामा नये, असेदेखील शहा म्हणाले.




भारतीय न्यायिक संहिता, भारतीय नागरी संरक्षण संहिता आणि भारतीय पुरावा कायदा यांनी अनुक्रमे वसाहतकालीन भारतीय दंड संहिता, फौजदारी प्रक्रिया संहिता आणि भारतीय पुरावा कायदा १८७२ ची जागा घेतली आहे. हे नवे कायदे गेल्या वर्षी १ जुलैपासून लागू झाले आहेत. सात वर्षांपेक्षा जास्त शिक्षा झालेल्या प्रकरणांमध्ये ९० टक्क्यांहून अधिक शिक्षा होण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत आणि दोषींना लवकरात लवकर शिक्षा व्हावी यासाठी पोलीस, सरकारी वकील आणि न्यायव्यवस्था यांनी एकत्रितपणे काम करावे.

गुन्ह्यांशी संबंधित कलमांचा गैरवापर टाळण्यासाठी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी संघटित गुन्हेगारी, दहशतवाद आणि मॉब लिंचिंगच्या प्रकरणांवर नियमितपणे लक्ष ठेवावे.

कारागृह, सरकारी रुग्णालये, बँका, फॉरेन्सिक सायन्स लॅबोरेटरीज (एफएसएल) इत्यादी सुविधांमध्ये दृश्य माध्यमाद्वारे पुरावे जतन करण्याची व्यवस्था असावी.

क्राइम अँड क्रिमिनल ट्रॅकिंग नेटवर्क अँड सिस्टीम्स (सीसीटीएनएस) द्वारे दोन राज्यांमध्ये एफआयआर हस्तांतरित करता येईल, अशी प्रणाली लागू करावी.

प्रत्येक पोलीस उपविभागात फॉरेन्सिक सायन्स मोबाइल व्हॅनची उपलब्धता सुनिश्चित करावी.


महाराष्ट्र सरकारने राज्याची 'फिंगरप्रिंट आयडेंटिफिकेशन सिस्टीम' एनएएफएसआयशी (नॅशनल ऑटोमेटेड फिंगरप्रिंट आयडेंटिफिकेशन सिस्टीम) संलग्न करावी.

---

# श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरास माघी यात्रेत ३ कोटी ३ लाखाचे उत्पन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर /प्रतिनिधी : माघ यात्रा कालावधीत भक्तांनी श्री विठ्ठल- रुक्मिणी मातेच्या चरणी लाखो रुपयांचे दान केले तसेच सोन्या चांदीचे दागिने अर्पण केले. मंदीर समितीला लाडू प्रसाद, देणगी, भक्तनिवास, पुजा, फोटो विक्री आदी विविध देणग्यांच्या माध्यमातून मंदिरे समितीस ३ कोटी ३ लाखाचे उत्पन्न मिळाल्याची माहिती मंदिरे समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.



माघ यात्रेसाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून तसेच परराज्यातून लाखोंच्या संख्येने भाविक आले होते. माघ शुध्द ०१ (दिनांक ३० जानेवारी) ते माघ शुध्द १५ (दिनांक १२ फेब्रुवारी) या कालावधीत भाविकांनी श्रींच्या चरणाजवळ ३२३३४२० रुपये अर्पण, ८०३४१२८ रुपये देणगी, ४०८१००० रुपये लाडू प्रसाद विक्री, ३६८३९६९ रुपये भक्तनिवास , ८८८८०० पुजेच्या माध्यमातून, ८६४८१५२ रुपये हुंडीपेटी , १०३९७०७ रुपये सोने-चांदी अर्पण, तसेच फोटो, महावस्त्रे, शेणखत, गोमुत्र, मोबाईल लॉकर, जमा पावती, चंदन आदी माध्यमातून ६९७६४० रुपये उत्पन्न प्राप्त झाले आहे.

मागील वर्षी श्रींच्या चरणाजवळ ३२४७७७४ रुपये अर्पण , ८९०२७९८ रुपये देणगी, लाडूप्रसाद विक्रीतून ३९४४०००, भक्तनिवास ५०९०७२१ रुपये, ७२८६०० रुपये पुजेच्या माध्यमातून, ११५९८७३९ रुपये हुंडीपेटीतून, ५१५८०५ रुपयाचे सोने-चांदीचे दागिणे अर्पण, तसेच फोटो, महावस्त्रे, शेणखत, गोमुत्र, मोबाईल लॉकर, जमा पावती, चंदन आदी माध्यमातून ९९४०८२ रुपये प्राप्त झाले होते.

सन २०२४ च्या माघी यात्रेत रू.३५०२२५१९/- व या वर्षीच्या यात्रेत रू.३०३०६८१६/- इतके उत्पन्न प्राप्त असून, मागील यात्रेच्या तुलनेत रू.४७१५७०३/- इतकी घट झाल्याचे दिसून येत आहे. यामध्ये प्रामुख्याने सुमारे ४ लाख ५० हजार लाडूप्रसादाची विक्री झाली असून, सुमारे ५२ ग्रॅम सोने व ६ किलो चांदीच्या वस्तू प्राप्त झालेल्या आहेत. या मिळालेल्या दानातून श्री विठ्ठल रूक्मिणी मातेच्या दर्शनासाठी येणाऱ्या वारकरी भाविकांना पुरेसा प्रमाणात सोई सुविधा उपलब्ध करून देण्याचा मंदिर समितीचा प्रयत्न राहील असेही यावेळी श्री श्रोत्री यांनी सांगीतले.

---

### पक्षाचे अध्यक्ष अजित पवारांच्या निर्णयाने आश्चर्य

# राष्ट्रवादीच्या प्रमुख समितीत भुजबळ, मुंडे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मंत्रिपद नाकारल्यानंतर थयथयाट करणारे छगन भुजबळ आणि बीडमधील सरपंच हत्याप्रकरणात वादग्रस्त ठरलेले अन्न व नागरी पुरवठामंत्री धनंजय मुंडे या दोघांचा राष्ट्रवादीचे पक्षाध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पक्षाच्या गाभा (कोअर) समितीत समावेश केला आहे. पवारांच्या या निर्णयाने पक्षाचे अन्य नेते मात्र आवाक् झाले आहेत.



धनंजय मुंडे यांच्यावर दररोज होणाऱ्या आरोपांमुळे पक्षाच्या प्रतिमेला तडा जात असल्याची चर्चा होती. त्यावरून मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणीही करण्यात येत होती. परंतु अशा वादग्रस्त प्रतिमा झालेल्या मुंडे यांना पक्षाच्या अंतर्गत वर्तुळात प्रवेश देऊन अजित पवारांनी त्यांचे पक्षातील स्थान अधिक भक्कम केले आहे. पवारांनी दिलेले अभय व पक्षातील नवी नेमणूक लक्षात घेता मुंडे यांच्यावरील गंडांतरही टळल्याचे मानले जात आहे.

मंत्रिपद नाकारल्यानंतर भुजबळ यांनी थेट अजित पवार यांनाच लक्ष्य केले होते. त्यातच गेले काही दिवस भुजबळ पक्षाच्या बैठकांकडे फिरकत नव्हते. शिर्डीतील पक्षाच्या अधिवेशनाला त्यांनी काही वेळ हजेरी लावली, पण भाषणात अजित पवारांना त्यांनी लक्ष्य केले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी झालेल्या भेटीनंतर भुजबळ हे भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याच्या वावड्या उठल्या होत्या. परंतु मुंडेंप्रमाणे भुजबळ यांचाही पक्षाच्या गाभा समितीत समावेश झाल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखालील सात सदस्यीय 'गाभा' समितीत प्रफुल पटेल, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, दिलीप वळसे-पाटील, हसन मुश्रीफ आदींचा समावेश आहे.

धनंजय मुंडे यांचा राष्ट्रवादीच्या गाभा समितीत समावेश केल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. त्यांना ज्या पद्धतीने अभय दिले जात आहे, त्यावरून बीड प्रकरणातील धुरळा खाली बसताच त्यांच्याकडे बीडचे पालकमंत्रीपदही सोपविले जाऊ शकते, अशी चर्चा पक्षात रंगली आहे.


---

# पुण्यातील गुइलेन बॅरे सिंड्रोमच्या उद्रेकाचं कारण महिनाभरानंतर अखेर सापडलं!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : पुणे विभागात गुइलेन बॅरे सिंड्रोमचे (जीबीएस) २०५ रुग्ण आढळून आले असून, त्यापैकी निम्मे रुग्ण हे सिंहगड रस्त्याच्या ५ किलोमीटर परिसरातील आहेत. या रुग्णांमध्ये प्रामुख्याने कॅम्पायलोबॅक्टर जेजुनी आणि नोरोव्हायरसचा संसर्ग आढळून आला असून, हेच जीबीएस उद्रेकाचे कारण असल्याची माहिती सार्वजनिक आरोग्य विभागाने शुक्रवारी दिली.

पुणे विभागात ९ जानेवारीपासून जीबीएसचा उद्रेक सुरू झाला. आता जीबीएसची रुग्णसंख्या २०५ वर पोहोचली आहे. या रुग्णांपैकी १०६ म्हणजेच ५१ टक्के रुग्ण सिंहगड रस्त्याच्या ५ किलोमीटर परिसरातील आहेत. याचवेळी उरलेले ९९ रुग्ण पुणे शहरातील इतर भाग, ग्रामीण आणि जिल्ह्याच्या भागात आढळून आले आहेत. सिंहगड रस्ता परिसरात आढळलेले ९० रुग्ण हे नांदेड गावातील विहीर आणि खडकवासला धरणातील पाण्याचा स्रोत वापरणारे आहेत. या परिसरातील ३ जीबीएस रुग्णांचा मृत्यू झाला असून, त्यातील दोघांचा जीबीएसमुळे आणि एकाचा इतर कारणामुळे मृत्यू झाला आहे, असे आरोग्य विभागातील सूत्रांनी सांगितले.



सिंहगड रस्ता परिसरातील जीबीएस रुग्णांच्या तपासणीमध्ये २५ रुग्णांमध्ये कॅम्पायलोबॅक्टर जेजुनी हा जीवाणू संसर्ग निष्पन्न झाला आहे. याचवेळी ११ रुग्णांना नोरोव्हायरस हा विषाणू संसर्ग झाल्याचे निदर्शनास आले आहे. या परिसरातील पाण्याच्या विविध स्त्रोतांमधील नमुन्यांची तपासणी करण्यात आली. त्यातील ४० नमुन्यांचे अहवाल आतापर्यंत हाती आले आहेत. त्यापैकी ८ नमुन्यांमध्ये कोलिफॉर्म, २५ नमुन्यांमध्ये ई-कोलाय व कोलिफॉर्म, ६ नमुन्यांमध्ये नोरोव्हायरस आणि एका नमुन्यामध्ये कॅम्पायलोबॅक्टर जेजुनी आढळून आला, असे आरोग्य विभागातील सूत्रांनी नमूद केले.

---

### बाजारपेठ खुली करण्यावर भारत-अमेरिका मतैक्य

### द्विस्तरावरील कराराची बोलणी सुरू

# 'भारत-अमेरिकेमधील व्यापार २०३०पर्यंत दुपटीहून अधिक नेण्याचे उद्दिष्ट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली/वॉशिंग्टन : 'भारत-अमेरिकेमधील व्यापार २०३०पर्यंत दुपटीहून अधिक म्हणजेच ५०० अब्ज अमेरिकी डॉलरपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट असून, या संदर्भात द्विस्तरावरील कराराची बोलणी सुरू झाली आहेत. आयातशुल्क कमी करणे आणि परस्पर बाजारपेठांचा प्रवेश यातून मिळणार आहे,' अशी माहिती पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या भेटीनंतर प्रसिद्ध झालेल्या संयुक्त पत्रकात देण्यात आली आहे.

या पत्रकानुसार, दोन्ही नेत्यांनी द्विस्तरावरील व्यापारी संबंध वाढविण्याची कटिबद्धता दर्शविली. योग्य व्यापारी पद्धत राष्ट्रीय सुरक्षेची काळजी, रोजगारनिर्मितीची हमी त्यातून देण्यात येईल. दोन्ही नेत्यांनी 'मिशन ५००' हे उद्दिष्ट त्यासाठी ठेवले आहे.

दोन्ही देशांतील व्यापार २०३०पर्यंत ५०० अब्ज अमेरिकी डॉलरहून अधिक नेण्यात येणार आहे. असे होण्यासाठी नव्या व्यापारी नियमांची आवश्यकता असून, त्यासाठी २०२५ अखेरीपर्यंत द्विस्तरावर करार करण्यासाठी चर्चा करण्यात येईल. या चर्चेसाठी दोन्ही देश वरिष्ठ प्रतिनिधी नियुक्त करतील. लष्करी, वाणिज्य, तंत्रज्ञान अशा सर्व क्षेत्रांत व्यापारवृद्धी केली जाईल. वस्तू आणि सेवा क्षेत्रात एकत्रित दृष्टिकोन भारत आणि अमेरिकी त्यासाठी ठेवेल. बाजारपेठीय प्रवेश, आयातशुल्कात कपात आणि करमुक्त अडथळे, साखळी पुरवठा यंत्रणा यामध्येही उभय देशात एकत्रित काम होईल.

चीनबरोबरील सीमावाद, भारताने तिसऱ्या देशाचा हस्तक्षेप पुन्हा धुडकावला

ट्रम्प यांच्या पहिल्या अध्यक्षपदाच्या काळात भारताबरोबर छोटा व्यापारी करार करण्यावर चर्चा झाली होती. पण, बायडेन प्रशासनाने मुक्त व्यापारी करारावरील ही चर्चा गुंडाळून टाकली. भारताने बोरबॉन, मोटरसायकल, माहिती-तंत्रज्ञानमधील उत्पादनांवरील आयातशुल्क कमी केल्याचे अमेरिकेने स्वागत केले आहे. तसेच, भारतातील आंबा आणि डाळिंबाच्या निर्यातीवर उपाययोजना करण्यासाठी अमेरिकेने उचललेल्या पावलांचे भारताने स्वागत केले आहे. कृषी क्षेत्रातील व्यापारवाढीवरही दोन्ही देश येत्या काळात काम करतील.



भारत आणि अमेरिका १० वर्षांसाठी संरक्षण भागीदारी करणार आहे. अमेरिकेकडून येत्या काळात भारताला शस्त्रांची अधिक विक्री होणार असून, अत्याधुनिक 'एफ-३५' विमानही भारताला देण्यात येणार आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या भेटीची दखल जगभरातील माध्यमांनी घेतली. प्रत्येक माध्यमांनी भेटीतील एखाद्या पैलूला महत्त्व दिल्याचे दिसले.

'रॉयटर्स' या वृत्तसंस्थेने भारत-अमेरिकेतील व्यापारी कराराच्या वृत्ताला महत्त्व दिले आहे. दोन्ही देशांतील व्यापार २०३०पर्यंत ५०० अब्ज डॉलरचा होण्याचे उद्दिष्ट दोन्ही देशांनी ठेवले आहे. 'असोसिएटेड प्रेस'ने ट्रम्प यांनी भारताने अमेरिकेवर लादलेल्या आयातशुल्कावर टीका केली आहे. तसेच, भारताच्या वस्तूंवरही भारत अमेरिकेच्या वस्तूंना लावतो, तितकेच कर लावेल, या ट्रम्प यांच्या विधानाला महत्त्व दिले आहे.

'फायनान्शिअल टाइम्स'ने अमेरिका-भारताच्या वाढत्या लष्करी सहकार्याचे महत्त्व अधोरेखित केले आहे. यामध्ये अत्याधुनिक एफ-३५ लढाऊ विमानाची भारताला देण्याच्या शक्यतेसह संरक्षण क्षेत्रातील इतर सहकार्याचे मुद्दे अधोरेखित करण्यात आले आहे. बेकायदा मानवी तस्करी आणि मानवी हक्क्यांच्या मुद्द्यालाही माध्यमांनी महत्त्व दिले आहे. 'ब्लूमबर्ग'ने भारत अमेरिकेकडून तेल आणि गॅसची आयात वाढविण्याचे वृत्त ठळकपणे दिले आहे. याद्वारे दोन्ही देशांतील व्यापारी तूट कमी होण्याबरोबरच आयातशुल्क कमी होण्याची शक्यता आहे.

'बीबीसी'ने या भेटीला केवळ प्रातिनिधिक पातळीवरचे रूप दिले आहे. व्यापारी मुद्द्यांवर फारशी प्रगती झाली नसल्याचे या वृत्तवाहिनीने म्हटले आहे. मात्र, भेटीच्या या संधीचा फायदा दोन्ही देशांनी आपापले सामरिक संबंध अधिक मजबूत करण्यासाठी करून घेतला, असे म्हटले आहे.

'एएफपी'ने भूराजकीय दृष्टिकोनावर भर दिला असून, या बैठकीद्वारे चीनच्या प्रभावाला काटशह देण्याची चाल अमेरिकेची आहे, असे भाष्य केले आहे. ट्रम्प यांचा करधोरणाचा फटका भारत, ब्राझील, व्हिएतनाम आणि इतर आग्नेय आशियायी आणि आफ्रिकी देशांना बसेल, असे भाष्य 'सीएनएन'ने केले आहे. 'फॉक्स न्यूज' भारत आणि अमेरिकेतील वाढते संबंध दाखविले आहेत.

अमेरिकी रचनेच्या अणुभट्ट्या

भारताबरोबर १६ वर्षांपूर्वी झालेल्या नागरी अणुकरारानुसार अमेरिकी रचनेच्या अणुभट्ट्या भारतात तयार करण्यात येणार आहेत. त्या दृष्टिने दोन्ही देश आता पुढे जातील.

ऊर्जा सुरक्षेमध्ये दोन्ही देश परस्पर भागीदारीचा विस्तार करतील, यावर दोन्ही देशांचे एकमत झाले आहे. तंत्रज्ञान हस्तांतराचाही यामध्ये विचार करण्यात येईल.

मोदी-ट्रम्प भेटीनंतर प्रसिद्ध केलेल्या संयुक्त पत्रकात ही माहिती देण्यात आली आहे. अणुभट्ट्यांमुळे नुकसान झाल्यास जबाबदारी कुणाची, यासंबंधी करण्यात आलेल्या कायद्यामुळे आण्विक सहकार्यात पुढे जाता आले नव्हते.

मात्र, नुकत्याच झालेल्या अर्थसंकल्पात अणुऊर्जा कायदा आणि नुकसानासंबंधी जबाबदारीचा कायद्यात सुधारणा करण्याची भारताने घोषणा केली. त्याचे दोन्ही देशांनी स्वागत केले.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या 'मेक अमेरिका ग्रेट अगेन'च्या (एमएजीए, मागा) धर्तीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी 'मेक इंडिया ग्रेट अगेन' (एमआयजीए, मिगा) अशी घोषणा केली. तसेच, 'मागा' आणि 'मिगा' मिळून दोन्ही देशांतील समृद्धीसाठी 'मेगा' भागीदारी होईल, अशी कोटी करून, याने दोन्ही देशातील संबंध नव्या उंचीवर जातील, असे वक्तव्य केले. ट्रम्प आणि मोदी यांच्या संयुक्त पत्रकार परिषदेत मोदींनी शब्दांची ही कोटी केली.

गौतम अदानींचा मुद्दा चर्चेत निघाला का, या प्रश्नावर मोदी म्हणाले, 'भारत लोकशाहीवादी देश आहे आणि आमची संस्कृती 'वसुधैव कुटुंबकम्' अशी आहे. आम्ही सारे जग एक कुटुंब मानतो. प्रत्येक भारतीय माझा आहे, यावर मी विश्वास ठेवतो. अशा वैयक्तिक बाबींवर दोन देशांतील प्रमुख नेत्यांमध्ये चर्चा होत नाही.'

## संपादकीय....

# उन्हाळ्याची चाहूल

राज्यातील सरासरी कमाल तापमान ३५ अंश सेल्सिअवर गेले आहे. पुढील चार दिवस कमाल - किमान तापमानात आणखी एक ते दोन अंश सेल्सिअसने वाढ होण्याचा अंदाज आहे. फेब्रुवारी अखेरपासून तापमान वाढ होऊन उन्हाळ्याची चाहूल लागेल. हवेच्या वरच्या स्थरात असलेली वाऱ्याची प्रतिचक्रीय स्थिती आणि उत्तरेत थंडीच्या लाटांसह थंड हवेचे झोत येण्याची शक्यता नसल्यामुळे राज्यासह देशभरात फेब्रुवारी महिन्याच्या उर्वरीत दिवसांमध्ये उन्हाच्या झळांची तीव्रता वाढणार आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, मध्य भारतात सोमवारपासून (१६ फेब्रुवारी) हवेच्या वरच्या स्थरात वाऱ्याची प्रतिचक्रीय स्थिती निर्माण होण्याचा अंदाज आहे. त्यामुळे उत्तरेत असलेले थंड वारे राज्यापर्यंत येणार नाहीत. शिवाय उत्तर भारतात पुढील आठवडाभरात थंड हवेचे झोत अथवा थंडीची लाट येण्याची शक्यता नाही. त्यामुळे उत्तरेतून राज्यात थंड हवा येण्याची शक्यता मावळली आहे. परिणामी उत्तर महाराष्ट्र, उत्तर विदर्भासह राज्याच्या बहुतेक भागात तापमान वाढ झालेली दिसून येत आहे. त्यात भर म्हणून बंगालच्या उपसागरातून आणि अरबी समुद्रातून बाष्पयुक्त वारे राज्याच्या दिशेने येत असल्यामुळे राज्यात कमाल तापमान ३५ अंश सेल्सिअसपर्यंत वाढले आहे. सोमवारपासून (१६ फेब्रुवारी) पुढील चार दिवस तापमानात आणखी एक - दोन अंश सेल्सिअसने वाढ होण्याची चिन्हे आहेत. उत्तरेत थंड हवेचे झोत म्हणजेच पश्चिमी थंड वारे येण्याची शक्यता कमी झाली आहे. त्यामुळे उत्तरेतही पहाटेच्या तापमानात वाढ होऊन तापमान स्थिर झाले आहे.

# मराठीचे भवितव्य : आपली जबाबदारी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

माय मराठी भाषा नांदावी आपल्या ओठावर
तिचे आषाढ मेघ बरसावे आपल्या जीवनावर
इथे तिथे वाचता यावा तिच्या अक्षरांचा चेहरा
तिच्या अमृतशब्दांना करावा मानाचा मुजरा

सोलापूर, दिनांक १४ (जिमाका):- मराठी भाषेला मानाचा मुजरा करावा इतपत आपली भाषा समृध्द आहे. मराठी भाषा प्राचीन साधरणपणे २४०० वर्षाची भाषा आहे. बाराव्या शतकात संत ज्ञानेश्वर महाराजांनी तिचे अस्सल गुणगौरव गायले आहे. भारतात मराठी भाषा ही तिसऱ्या क्रमांकाची आहे. जवळपास १५ कोटी लोक ही भाषा व्यवहारात बोलली जाते. मराठी भाषेतून ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त झालेले मराठीत साहित्यिक आहेत. महाराष्ट्रात तिला महाराष्ट्राची राज्यभाषा म्हणून मान्यता प्राप्त झाली आहे.

मराठी भाषेत एका शब्दांचे अनेक अर्थ उपलब्ध आहेत. भाषेमध्ये लवचीकता हा तीचा मुलभूत अंश आहे. तसे इतर भाषेमध्ये याचा वनवा आहे. तिचा मार्दव गोडवा आपणास अधिक भावतो.

भाषेचा वापर ही मुख्यता: आपल्या घरातून सुरूवात व्हायला हवी मराठी माणूस भेटल्यानंतर अथवा रिक्षा टॅक्सीवाले यांच्याशी आपण मराठीतच बोलले पाहिजे, रस्त्यावरचा व्यावसायिक पाट्याही मराठीत असाव्यात, बस स्टॅन्ड, रेल्वे स्टेशन जिथे जिथे लोकांचा समूहाने वावर असतो तिथे मराठी भाषा आपण बोलली पाहिजे, मराठी साहित्य, ग्रंथ, शाळा, शिक्षण, वर्तमानपत्र, दुरदर्शन, मराठी मालिका, चित्रपट, यामुळेही आपली भाषा समृध्द होते. शासकीय कार्यालय व न्याय व्यवस्थेमध्ये मराठी भाषेचा वापर व्हायला हवा. जे काही थोडे बहूत इंग्रजी शब्द मराठीत रूजलेत ते तसेच राहिले तरी मराठी भाषा उन्नत होईल. लहान मुलांना मराठी गोष्टीचे चांदोबा, इसाब निती, राष्ट्रपुरूषांचे, महापुरूषांचे थोर व्यक्तींचे चरित्र पुस्तके वाचायला द्यायला हवी व आपण मराठीतून कथा सांगायला हव्यात, मुलांना बाजारातून फिरवताना त्यांस विविध वस्तुंची नावे मराठीतूनच सांगायला हवीत.

मराठी भाषा बोलण्यामुळे आपणास कमीपणा येतो ही न्युनगंडाची भावना आपण दूर करायला हवी. वास्तवीक पाहता आपण इतर, इतरांना मराठी भाषेची गोडी लावायला हवी, प्रोत्साहीत करायला हवे मराठी भाषेतील ज्ञान आपणास अचंबीत करेल, इतके विविध विषयातील अफाट शब्द भांडार आहे. १ मे हा दिवस महाराष्ट्र दिन व २७ फेब्रुवारी मराठी भाषा गौरव दिन म्हणून विविध मराठी संस्था साजरा करतात. त्यात आपण हिराहिरीने भाग घ्यायला हवा मराठी भाषा संवर्धन करायला हवी. हे आपले आद्य कर्तव्य आहे. मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाला त्यामुळे, मराठी भाषेला त्यामुळे नवचौतन्य मिळेल. यासाठी सर्वसामान्य मराठी मानसाने शासनाकडे पाठपुरावा करायला हवा. महाराष्ट्र मराठी साहित्य परिषद शाखेने जोमाने काम करायला हवे जेनेकरून मराठी भाषेला गतवैभव प्राप्त होईल व मराठी भाषेचे संवर्धन होईल.

मराठी भाषेमध्ये अहिराणी, माणदेशी, मालवणी,कोळी, कोल्हापूरी, चंदगडी, बोली, बेळगावी, मराठवाडी, नागपूरी, वराडी, जाडी बोली , तंजावर मराठी, नारायणपेठी बोली, भटक्या विमुक्त या ही मराठी मातृ भाषेच्या संलग्न भाषा जतन व्हायला हवीत. वरील सर्व बोलीभाषेतील साहित्यीक आपल्या परीने लिखानातून व्याख्यानातून भाषेला जिवंत ठेवण्याचा प्रयत्न करीत आहेत. राज्य शासन ही मराठी भाषेच्या संवर्धनासाठी विविध निर्णय घेत आहे. तसेच शासकीय व्यवहारात मराठी भाषा वापरण्याबाबत शासन निर्णय निर्गमित केलेले आहेत. त्याची ही अंमलबजावणी काटेकोरपणे केल्यास मराठी भाषाचे उत्कृष्ट संवर्धन होईल, असे वाटते.

संत ज्ञानेश्वर यांचे बोलच मराठीला तारतील.

माझा मराठीची बोलू कौतूके!
परी अमृतातेही पैजासी जिंके!
ऐसी अक्षरे रसिके! मेळवीन!!

**– मारूती कटकधोंड**
**(संपर्क क्रमांक– ९८८११२४४५०)**

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, दिल्ली २०२५

उत्सव अभिजात मराठीचा!

# पोलादी प्रयत्नांती सुवर्णपदक : ॲड.अविनाश बनसोडेंची यशोगाथा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पन्नाशी म्हणजे वृद्धपकाळाकडे वाटचाल या पारंपरिक विचारधारेला छेद देणारा मी आजही विद्यार्थी आणि आजन्म विद्यार्थीच राहीन या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारधारेला आपली जीवनधारा बनवत सोलापूरच्या एका ५० वर्षीय युवकाने आंबेडकर विचारधारा या विषयातून एम.ए ची पदवी पहिल्या क्रमांकाने उत्तीर्ण होऊन सोन्याचे पदक पटकावले. मोबाईलच्या अतिवापराने मानसिकतेने व्यसनाधीन झालेल्या तरुणाईला या सोलापूरच्या युवकाने अक्षरशः लाजवले. आपल्या बुद्धिमत्तेला तरुणाप्रमाणे तोच बहरत ठेवतो जो आंबेडकरी विचारधारेवर चालतो. आपल्या शालेय तसेच महाविद्यालयिन जीवनात घरात एकही फुटकी सोन्याची मणी नसताना सोन्याचं पदक मिळवण्याचं स्वप्न पाहिलं आणि आज ते पूर्ण केलं. काय ही जिद्द!

अविनाश बनसोडे हे एक कवी, लेखक, वकील तसेच सोलापूर महानगरपालिकेचे माजी नगरसेवक आहेत यावर विश्वास बसणार नाही. नक्कीच अशा अष्टपैलू व्यक्तिमत्वाचा प्रवास इतका साधा नव्हता.

अठरविश्व दारिद्र्य असलेल्या घरात माझ्या वडिलांचा जन्म झाला. एका झोपडपट्टीत त्यांनी आपलं बालपण घालवलं.शालेय जीवन जगत असतानाच त्यांच्या गल्लीतील रोजची भांडणं शिवीगाळ व्यसनाधीन झालेली तरुण पिढी ते दररोज उघड्या डोळ्यांनी पाहायचे आणि बालवयातील त्यांच्या कोवळ्या हृदयावर ते आपसूकच रुतले जायचे. शाळेत नेहमी पहिला क्रमांक पटकावलेल्या विद्यार्थ्याला आता उत्तम अशा महाविद्यालयाची वाट धरायची होती पण आपल्या नाजूक असलेल्या आर्थिक परिस्थितीमुळे ते धजावले पण गुरू ते गुरुच असतात. अशा हुशार आणि अभ्यासू व्यक्तिमत्वाला ते मदत करायला कसे मागे सरकतील? शिक्षकवर्गांनी आर्थिक मदत केली आणि माझ्या वडिलांनी अक्कलकोट येथील खेडगी महाविद्यालयात पहिलं पाऊल टाकलं आणि त्यांच्या महाविद्यालयीन जीवनास सुरुवात झाली. पुढे त्यांनी 'महाविद्यालयाचा आदर्श विद्यार्थी ' म्हणून आपल्या नावे इतिहास रचला. परंतु परिस्थितीने पुन्हा त्यांना काळोखात ओढलं आणि ते आपल्या पोटाची खळगी भरण्यासाठी सोलापूरमध्ये असलेल्या एका हॉटेलमध्ये वेटर म्हणून कामाला लागले. क्षणभर माझ्या मनात विचार आला जर आजचा तरुण आदर्श विद्यार्थी हा गुणगौरव मिळवून वेटरच्या कामाला लागला असता तर काय झालं असतं?? नक्कीच तो आईवडिलांना दोष देत तो घरी बसला असता. बरोबर ना? पण माझ्या वडिलांनी तस नाही केलं याउलट त्यांनी आपल्या लग्नाची जबादारी स्वतः स्वीकारली आणि स्वतःच्या हिमतीने आणि आई वडिलांच्या आशीर्वादाने आपला संसार थाटला. संसाराचा गाढा ओढताना त्यांच्यातील विध्यार्थी मात्र स्वस्थ बसेना लगेचच त्यांनी एम. ए. साठी प्रवेश निश्चित केला. टायर नसलेल्या सायकलवर माझ्या वडिलांनी दिवस घालवले पण परिस्थिती समोर हताश न होता त्यांनी लहानपणापासून बघत, सोसत आलेल्या वणव्याला आणि उन्हाला आपल्या लेखणीने साऱ्या जगासमोर मांडलं. वयाच्या ३२ व्या वर्षी त्यांनी काही उन्हातले काही वणव्यातले या काव्यपुस्तकाचे प्रकाशन तत्कालीन मंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते केलं. हुश्श...! आता मी जिंकलो! असे म्हणणारे ते अविनाश कसले..? ज्या गल्लीत जन्मले, वाढले त्याच गल्लीचा (प्रभाग) नगरसेवक होण्याचे स्वप्न त्यांनी उराशी बाळगलं आणि ते निवडूनही आले. भर चौकात लावलेल्या नगरसेवक अविनाश बनसोडे ही पाटी अनेक युवकांना प्रेरणा आणि नवी उमेद देत होती. पुढे जाऊन पुन्हा त्यांच्या आयुष्यात काळोख आला. पुढील निवडणुकीत त्यांना पराभव पत्करावा लागला. लहानपणापासून यश-अपयशाची चव चाखलेल्या माझ्या वडिलांनी आपला पराभव परीने हाताळला परंतु जनतेचा एकही रुपया न खाल्लेला स्वाभिमानी आणि प्रामाणिक सेवक म्हणून आम्हा तिन्ही भावंडांना सार्थ अभिमान आहे. त्यांनी व्यवसाय केला आणि परिवाराचा उदरनिर्वाह केला. गेली अनेक वर्षे खिशात पैसा नसताना ते खचले नाहीत.पुढे त्यांनी एल.एल.बी. करायचं ठरवलं आणि त्यांनी ही पदवी आपल्या नावे केली. ते आता ऍड अविनाश बनसोडे आहेत. किती जिद्द ती! आपल्याला माणूस म्हणून जगण्याचा, श्वास घेण्याचा अधिकार देणाऱ्या माझ्या बापाला म्हणजेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना ते कसे विसरतील. काही वर्षांपूर्वी सोलापूरमध्ये झालेल्या आंबेडकरी वैचारिक साहित्य संमेलनाचे ते समेलध्यक्ष ही होते. खऱ्या अर्थाने आपल्या विचारात आणि रक्तात माझ्या वडिलांनी आंबेडकरवाद पेरला म्हणूनच त्यांनी जळगाव येथील विद्यापीठात एम. ए. साठी आंबेडकर विचारधारा हा विषय घेतला आणि विशेष म्हणजे एम. ए. प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होत त्यांनी सुवर्णपदक आपल्या नावे केला. माझा संसार झाला मुलं झाली, नातवंडही झाली आता बस्स... मी जिंकलो! असं म्हणून आपल्या अविष्काराला थांबवणारे माझे वडील नाहीत याचा आम्हा खप अभिमान आहे.आपल्यातील कलागुणांना, बुद्धीचातुर्याला आणि विशेषकरून आपल्यातील विद्यार्थ्याला कधीही विनाश होऊ न देणारे ते अविनाश आहेत. म्हणूनच या इतिहासाच्या विद्यार्थ्याने आपल्या नावाचा इतिहास रचला आणि स्वतःच्या मेहनतीने आपलं नाव सुवर्ण अक्षरात कोरलं.

**– शुभदा अविनाश बनसोडे**

# पंढरपूर ब्राह्मण संघटनेच्या वतीने समाज रत्न बोंड उद्योजक पुरस्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर अर्बन बँक सभागृह शाखा बाजार येथे पंढरपूर शहर संघटनाच्या वर्धापनदिनानिमित्त पुरस्कार वितरण सोहळा बोंड संस्थापक श्री जितेंद्र कुलकर्णी सर संस्थापिका सौ उत्कर्ष कुलकर्णी मॅडम यांच्या प्रमुख उपस्थितीत शनिवार दिनांक १५ फेब्रुवारी २०२५ रोजी सायंकाळी सहा ते सात या वेळात संपन्न होणार आहे.

ब्राह्मण समाजाची आपण करत असलेल्या कार्याची दखल घेऊन बोंड ब्राह्मण संघटना परिवाराच्या पहिल्या वर्धापनदिनानिमित्त ब्राह्मण समाजाच्या उन्नतीसाठी आपणास समाज रत्न व समाज उद्योग पुरस्काराने सन्मानित करण्यात येत आहे

समाज रत्न पुरस्कार २०२५ प.पू. श्री मदन महाराज हरदास, मा. श्री संदीपजी वांजपे, मा. श्री धनंजय जी मांडके, मा. श्री प्रशांतजी चौधरी, यांना प्रदान करण्यात येणार आहे याच बरोबर पंढरपूर संघटनेसाठी महत्त्वपूर्ण सहकार्य व पंढरपुरातील प्रत्येक उद्योजक श्री आनंद तेंडुलकर, श्री नारायण बडवे, प्रसाद खानविलकर, श्री रमाकांत धूनखे, ऋषिकेश उत्पात, श्री पांडुरंग हरिदास, आदित्य जोशी, रामकृष्ण बिडकर, श्री चिंतामणी दामोदरे. यांना उद्योजक पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे तरी सर्व समाज बांधवांनी कार्यक्रमासाठी आवश्यक उपस्थित राहावे असे आव्हान परिवाराने केले आहे.

# पंढरपूर पंचायत समिती बी. डी. ओ. व ग्रामसेवकांवर कलम ९२ प्रमाणे शहर पो. ठाणे येथे गुन्हा दाखल करण्याची प्रहारची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : दिव्यांगांना पंढरपूर तालुक्यात प्रत्येक ग्राम पंचायती ने ५% अपंग निधी वाटप करणे बंधनकारक.परंतु बऱ्याच ग्रामपंचायच्या ग्रामसेवकांनी हा निधी वाटप केला नाहि. गटविकास अधिकारी यांना वारंवार लेखी अथवा तोंडी निवेदन देऊनही याकडे जाणून बुजुन दुर्लक्ष केले जात आहे. अनेक वेळा उपोषण, आत्मदहन सारखी आंदोलनेही करण्यात आली. त्याचाच एक भाग म्हणुन पंढरपूर बी. डी. आ. यांनी प्रहार संघटनेला पत्र देऊन मिटींगला बोलावले.

यावेळी तालुक्यातील सर्व ग्रामसेवकहि उपस्थित होते. परंतु प्रहार संघटनेच्या पदाधिकारी यांनी विचारलेल्या प्रश्नां मध्ये व ग्राम




सेवकानी दिलेल्या माहिती मध्ये तफावती असल्यामुळे संघटनेला आढळून आले.

त्यानंतर प्रहारचे पदाधिकारी, बी. डी. ओ. व ग्रामसेवकांमध्ये बाचाबाची झाली. व लागलीच ग्राम सेवक भुजबळ व इतर जणांनी प्रहार संघटनेचा निषेध व्यक्त करत प्रहार संघटनेवर सरकारी कामात अडथळा म्हणून गुन्हा दाखल करण्यासाठी काम आंदोलन सुरु केले. व दिव्यांगांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न केला. व पुन्हा निधी संदर्भात आमच्याकडे यायचे नाहि असे बी. डी. ओ. यांनी दिव्यांगांना सांगीतले. त्या नंतर प्रहार संघटनेने आम्हाला लेखी पत्र देऊन बोलावले व आम्हाला हिन दर्जाची वागणूक देऊन आरवाच्य भाषा वापरली म्हणून पंढसूर शहर पोलीस ठाण्यात बी. डी. ओ. तसेच ग्राम सेवक भुजबळ सह इतरांवर कलम ९२ नुसार गुन्हा दाखल करण्यासाठी निवेदन व अर्ज दिला आहे. जर यांचेवर गुन्हा दाखल करून घेतला नाहि तर संपूर्ण सोलापूर जिल्ह्यातील दिव्यांग पंढरपूर शहर पोलीस खाणे येथे आंदोलन करतील असा इशारा प्रहार दिव्यांगक्रांती महिला अध्यक्षा संजीवनी बारंगुळे यांनी दिला आहे.

# वागदरी येथे विविध धार्मिक कार्यक्रमाने संत तुकाराम महाराज गाथा पारायण सप्ताहास प्रारंभ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के. गायकवाड : ग्राम दैवत श्री संत सदगुरु भवानसिंग महाराज यांच्या कृपा आशीर्वादाने वारकरी सांप्रदायाचा वारसा लाभलेल्या तुळाजापूर तालुक्यातील वागदरी येथे गुरुवार दि .१३ फेब्रुवारी २०२५ रोजी श्री संत तुकाराम महाराज गाथा पारायण व श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सप्ताह व सामुदायिक विविह सोहळ्यास सुरुवात करण्यात आली आहे.

श्री सदगुरू भवानसिंग महाराज यांच्या कृपा आशिवदिने सकळ ग्रामस्थ वागदरीच्या वतीने वागदरी तुळजापूर येथे गुरुवार दि.१३/०२/२०२५ ते गुरुवार दि. २०/२ /२०२५ दरम्यान ह.भ.प. राजकुमार पाटील यांच्या व्यासपीठ आधिष्ठाणा खाली

श्री संत तुकराम महाराज गाथा



पारायण व श्रीमद् भागवत कथा.. ज्ञानयज्ञ सप्ताह व सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून या पारायण सप्ताह सोहळ्यास गुरुवार दि.१३ फेब्रूवारी २०२५ रोजी सकाळ ६ वा.विविध धार्मिक कार्यक्रमाने सुरूवात करण्यात आली.या सप्ताह निमित्ताने ह.भ.प ज्ञानेश्वर महराज दिंडेगावकर,वैभव महाराज भालकडे कानेगावकर,बालकिर्तनकार शुभम सिंग परिहार महाराज वागदरी, विलास कदम महाराज मांडवीकर,कृष्णा काकडे महाराज वागररी, राम गायकवाड महाराज चिकूंद्रा,राजकूमार पाटील महाराज वागदरी आदींची किर्तन सेवा होणार असून वागदरी व परिसरातील भजनी मंडळाच्या भजनाच्या (हरी जागर) कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.शेवटी दि.२०/२ /२०२५ रोजी ह.भ.प श्रीहरी ढेरे महाराज काक्रंबा यांच्या काल्याच्या किर्तनानंतर महाप्रसादाने या सप्ताहाची सांगता करण्यात येणार आहे. तरी वागदरी,नळदुर्ग व परिसरातील भावीक भक्तानी मोठ्या संख्येने या .पारायण सप्ताह सोहळ्यान मोठ्या संख्येने सहभागी होऊन लाभ घ्यावा असे आवहान श्रीसंत सदगुरु भवानसिंग महाराज भजनी मंडळासह समस्त ग्रामस्थानी केले आहे

# धोत्रा नंदई, अंढेरा व व इतर गावातील शेतीसाठी लागणाऱ्या पाण्यासाठी कटिबद्ध : आमदार मनोज कायंदे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे /बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी

गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित असलेल्या खडकपूर्णा प्रकल्पाचे डाव्या व उजव्या अस्तरीकरणामुळे उपलब्ध होणाऱ्या २.९३ दलघमी पाण्याद्वारे देऊळगाव राजा तालुक्यातील धोत्रा नंदई, अंधेरा व इतर गावातील शेतीसाठी लागणाऱ्या पाणी प्रश्नासाठी आज मंत्रालयामध्ये मदत व पुनर्वसन मंत्री तथा बुलढाणा जिल्ह्याचे पालकमंत्री मा. ना. श्री. मकरंद आबा पाटील व विदर्भ वैज्ञानिक विकास महामंडळ चे अधिकारी यांच्यासोबत बैठक घेऊन सकारात्मक चर्चा झाली असून तो प्रश्न मार्गी लावण्यासाठी कटिबद्ध आहे असे प्रतिपादन आमदार मनोज कायदे यांनी दिले. तत्कालीन जिल्हा परिषद सदस्य श्री भगवान मुंडे यांनी २००८ पासून देऊळगाव राजा तालुक्यातील धोत्रा नंदाई, अंढेरा व इतर गावे यांना



सिंचनासाठी पाणी उपलब्ध व्हावे अशी मागणी त्यांनी वर्षापासून लावून धरली होती. श्री भगवान मुंडे यांनी सिंदखेड राजाचे आमदार श्री मनोज कायंदे यांच्याशी यासंबंधी चर्चा केली. कार्यतत्पर आमदार श्री मनोज कायंदे यांनी लगेच महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री श्री अजित दादा पवार यांच्याशी चर्चा करून या संदर्भात बुलढाणा जिल्ह्याचे पालकमंत्री मा. ना. श्री मकरंद आबा पाटील यांना तातडीने बैठक लावण्याचे निर्देश दिले. यासंबंधी बुलढाणा जिल्ह्याचे पालकमंत्री मा. ना. श्री मकरंद आबा पाटील यांनी आज मंत्रालयामध्ये महत्त्वपूर्ण बैठक घेऊन सकारात्मक चर्चा करून हा प्रश्न मार्गी काढण्याचे प्रयत्न केले आहे. यामुळे या गावातील शेतकऱ्यांना खडकपूर्णा प्रकल्पातून सिंचनासाठी पाणी मिळाले तर सुमारे ५८७ हेक्टर क्षेत्रासाठी पाणी उपलब्ध होईल. या गावच्या पाणी प्रश्नावर कायम स्वरूपी तोडगा निघेल व याचा फायदा या गावातील शेतकऱ्यांना होईल. सदर आजच्या बैठकीला जिल्हा परिषद सदस्य भगवान मुंडे, प्रकाश गीते अवर सचिव प्रवीण कोल्हे, विदर्भ वैज्ञानिक विकास महामंडळाचे मुख्य अभियंता श्री जगत टाले, अधीक्षक अभियंता बापूसाहेब गाडे, अमोल चोपडे कार्यकारी अभियंता, खडकपूर्णा प्रकल्पाचे उपविभागीय अभियंता श्री नरेश घुले, शाखा अभियंता नितीन डोईफोडे,हे अधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### तेलंगी पाच्छा पेठ येथे बंद घर फोडले

सोलापूर : तेलंगी पाच्छा पेठ येथील बंद घराचे दार तोडून घरात प्रवेश करीत कपाटातील रोख रकमेसह सोन्या-चांदीचे दागिने असा एकूण दोन लाख ३८ हजारांचा ऐवज चोरून नेल्याची घटना ११ फेब्रुवारी रोजी सकाळी दहा ते सायंकाळी साडेचार वाजण्याच्या सुमारास घडली. याप्रकरणी फराह रशीद शेख (वय ५१, रा. तेलंगी पाच्छा पेठ, शाब्दी अपार्टमेंट तिसरा मजला) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

यात अधिक माहिती अशी की, फिर्यादी यांच्या घराच्या मुख्य दरवाजाचे कुलूप तोडून घरात प्रवेश करत बेडरूममधील लोखंडी कपाटातील साठ हजार रुपये किमतीचे दीड तोळ्याचे सोन्याचे नेकलेस, ३० हजार रुपये किमतीचे साडेआठ ग्रॅम तोळ्याची सोन्याची बोरमाळ, २४ हजार रुपये किमतीचे तीन कानातील सहा ग्रॅमचे फुले, एक लाख रुपये रोख रक्कम, २४ हजार रुपये किमतीचे तीन हातातील सहा ग्रॅम सोन्याच्या अंगठ्या असा दोन लाख ३८ हजार रुपयांचा ऐवज कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीच्या संमतीशिवाय मुद्दाम लबाडीने चोरून नेल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

# सोलापूरच्या नागरी प्रश्नांबाबत आमदार देवेंद्र कोठे यांनी घेतली मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट

## मुख्यमंत्र्यांनी दिले तातडीने आदेश : सोलापूरकरांनी मानले आभार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : सोलापूर शहराच्या विविध नागरी प्रश्नांबाबत आमदार देवेंद्र कुठे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन मागण्यांची निवेदने दिली. या मागण्यांची त्वरित दखल घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संबंधित विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना तातडीने आदेश देत कामांच्या पूर्ततेबाबत सूचना दिल्या.

सोलापूर शहरात असणाऱ्या अक्कलकोट रस्ता एमआयडीसी आणि होटगी रस्ता एमआयडीसी येथील उद्योजकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे येथील उद्योजकांनी आमदार देवेंद्र कोठे यांच्याकडे येथील प्रश्नांच्या सोडवणुकीची मागणी केली होती. याबाबत आमदार देवेंद्र कोठे यांनी उद्योगमंत्री उदय सामंत यांची भेटही घेतली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणात लक्ष घातल्यामुळे शहरा-तील दोन्ही एमआयडीसीसाठी ४० कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.

> **मुख्यमंत्र्यांनी घेतले माझ्याबरोबरच शहराच्या विकासाचे पालकत्व**
>
> **मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माझे राजकीय पालकत्व घेतल्यामुळेच मला विधानसभा निवडणुकीत यश मिळाले. आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माझ्या राजकीय पालकत्वाबरोबरच सोलापूर शहराच्या विकासाचेही पालकत्व घेतले आहे. त्यामुळे सोलापूरच्या विकासाला नव्याने गती मिळणार आहे.**
>
> **– देवेंद्र कोठे, आमदार, शहर मध्य**

छत्रपती श्री शिवाजी महाराज शासकीय सर्वोपचार रुग्णालयासाठी नवी एमआरआय मशीन उपलब्ध करून देण्याची मागणी ही आमदार देवेंद्र कोठे यांनी शासनाला केली होती. या मागणीची दखल घेऊन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जिल्हा नियोजन समितीतून सोलापूरच्या शासकीय रुग्णालयास एमआरआय मशीन देण्याचे आदेश दिले आहेत.

सोलापूर शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या पाकणी येथील जलशुद्धीकरण केंद्रासाठी वनविभागाची जागा हस्तांतरित करण्याची आग्रही भूमिका आमदार देवेंद्र कोठे यांनी शासनाकडे मांडली होती. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अत्यंत सकारात्मक प्रतिसाद देत पुढील कार्यवाहीचे आदेश दिले आहेत.

आमदार देवेंद्र कोठे यांनी शहरातील नागरिकांच्या सोयीसुविधा विषयक प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी पुढाकार घेतला असून शासन पातळीवर पाठपुरावा केल्यामुळे त्यांच्या प्रयत्नांना यश मिळत आहे. राज्याचे ग्रामविकास मंत्री आणि सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी सोलापूर शहरातील प्रश्नांवर उपाययोजना करण्यासाठी विशेष सहकार्य केल्याचे आमदार देवेंद्र कोठे यांनी सांगितले. आमदार देवेंद्र कोठे यांच्या माध्यमातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोलापूरच्या विकासकामात लक्ष घातल्यामुळे सोलापूरकरांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले आहेत.



# मुलींनी आरोग्य व स्वच्छता कडे लक्ष देणे काळाची गरज : ममता

## श्री जगद्गुरू पंचाचार्य प्रशालेत किशोरवयीन मुलीसाठी व्याख्यान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट,प्रतिनिधी

किशोरवयीन मुलीच्या आरोग्यसेवा आणि स्वच्छतेची गरज फार मोठ्या प्रमाणावर आहे.मानसिक आरोग्य आणि आरोग्य शिक्षण यासारख्या समस्यांचे निराकरण करून,आपण सर्वांनी मुलीच्या जीवनात सुधारणा घडवून आणण्यासाठी महत्त्वपूर्ण बदल घडवू शकतो.तसेच मुलींनी देखिल आपल्या आरोग्य व स्वच्छतेकडे लक्ष देणे काळाची गरज असल्याचे व्याख्यानात ममता मॅडम यांनी व्यक्त केल्या.



गौडगाव बु.(ता.अक्कलकोट) येथील श्री गुरु सिद्धमल्लेश्वर कल्याण केंद्र संचलित श्री जगद्गुरू पंचाचार्य माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशा-लेत किशोरवयीन मुलीसाठी पी एस जी कंपनी कडून व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. प्रारंभी मुख्याध्यापक कल्याणी देशेट्टी यांनी सर्व मार्गदर्शकांचे स्वागत केले. बोलतांना उषा हंचाटे म्हणाले की,मानसिक भावनिक संतुलन हे निकोप अध्ययनासाठी मदत करते.त्यामुळे मुलींनी आरोग्य व स्वच्छता कडे लक्ष देणे गरजेचे आहे तसेच आत्मविश्वास-ाने प्रत्येक प्रसंगाला सामोरे जाण्याची गरज असल्याचे म्हणाल्या. यावेळी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रशा-लेतील सहशिक्षिका भारती पोतदार, रेणुका चांनकोटे यांनी परिश्रम घेतले. सोनाली साठे यांनी उपस्थित सर्वांचेआभार मानले.

## पोलीस पाटील रघुनाथ भिकाजी बांद्रे यांचा ७५ वा वाढदिवस उत्साहात साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

खेड/केतन भोज : रत्नागिरी जिल्ह्यातील खेड तालुक्यातील बहिरवली गावचे मा.पोलीस पाटील श्री.रघुनाथ भिकाजी बांद्रे यांचा ७५ वा वाढदिवस रविवार दि.०२ फेब्रुवारी रोजी त्यांच्या राहत्या घरी गावी मोठ्या ऊत्साहात व थाटामाटात संपन्न झाला,रघुनाथ भि.बांद्रे हे २८ वर्षे २८ दिवसाची प्रदीर्घ सेवा पूर्ण करून पोलीस पाटील पदावरून सेवा निवृत्त झालेले एकमेव व्यक्ती आहेत,त्यांच्या कार्यकाळात त्यांनी बहिरवली गावातील कायदा,व सुव्यवस्था अबाधित राखण्याचा निष्ठेने प्रयत्न केले आहेत,त्यामुळे गा-वातच नव्हे तर शेजारच्या गा-वातही ते आजही फौजदार या



नावाने ओळखले जातात,त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना शुभेच्छा देण्याकरिता त्यांचे कुटुंबीय आणि मित्र परिवार तसेच अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते,त्यावेळी त्यांना त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

# श्री विठ्ठल रूक्मिणी मातेच्या चरणी सोन्याची चेन अर्पण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समितीस पंढरपूर येथील दानशुर भाविकाने सुमारे १६ ग्रॅम वजनाची सोन्याची चेन अर्पण केल्याची माहिती मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.

संबंधित भाविक हे श्रीक्षेत्र पंढरपूर येथील रहिवाशी असून, त्यांनी दिनांक १३ फेब्रुवारी रोजी नाव न जाहिर करण्याच्या अटीवर १६ ग्रॅम वजनाची चेन श्री विठ्ठल रूक्मिणी मातेच्या चरणी अर्पण केली आहे. त्याची अंदाजे १ लाख २३ हजार इतकी किंमत होत आहे.



मंदिर समितीने सोने चांदीच्या भेट वस्तू स्विकारण्यासाठी स्वतंत्र विभागाची निर्मिती केली असून, त्यासाठी विभाग प्रमुख, १ लिपीक संवर्गातील कर्मचारी व २ सराफ कर्मचारी नियुक्त करण्यात आलेले आहे. भाविकांना संगणकीकृत पावती देण्यात येते. ज्या भाविकांना सोने चांदीच्या वस्तू अर्पण करावयाच्या आ-हेत, त्यांनी मंदिर समितीच्या कार्यालयाशी संपर्क साधावा असे आवाहन देखील यावेळी श्री श्रोत्री यांनी केले.




# पंढरपूर तालुका पोलीस निरीक्षक टी.वाय. मुजावर यांच्यासह सहकाऱ्यांना बेस्ट डिटेक्शन अॅवार्ड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक टी. वाय. मुजावर यांच्या सहकार्यांना बेस्ट डिटेक्शन अवॉर्ड. गुन्ह्याचीउकल उत्तम पद्धतीने केल्याने पंढरपूर तालुका पोलिसांनी दरोडेच्या गुन्ह्यात तीन आरोपींना योग्य दिशेने तपास करीत जाहीर बंद केल्याने तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक टी वाय मुजावर यांच्यासह सहकाऱ्यांना गुरुवार दिनांक १३ फेब्रुवारी रोजी बेस्ट डिटेक्शन अवॉर्डने सन्मानित करण्यात आले आहे.

मध्यप्रदेश पासिंगची पिकप गाडी क्रमांक एमपी झिरो नऊ एस तीस दहा या गाडीच्या चालकाला चाकूचा धाक दाखवून चालकाला लाथा बुक्क्याने मारहाण करून पिकप गाडी जबरदस्तीने चोरून एकूण ११ लाख २५ हजार रुपयांचे घेऊन पळून गेले होते. सदर पुण्यामध्ये आरोपींच्या वर्णनावरून एकूण तीन आरोपी ताब्यात घेण्यात आले होते. त्यांनी सदरच्या गुन्हा केल्याची कबुली दिली व आरोपी गोविंद लिंबा पवार वय वर्ष २३ राहणार अंकोली तालुका मोहोळ निवाल अहमद शेख वय वर्ष २१ राहणार चिंचोली तालुका पंढरपूर यांच्या मिटकरी वय वर्ष ३२ राहणार आंबे चिंचोली तालुका पंढरपूर असे तीन आरोपी ताब्यात घेण्यात आले यांच्याकडून खरेदीचे दोन मोबाईल फोन एक पिकप गाडी क्रमांक एम पी झिरो नऊ ३० १० एकूण किंमत रुपये ११ लाख २५ हजार रुपयांच्या मुद्देमाल पंढरपूर तालुका पोलिसांनी जप्त करून आरोपींना अटक केली होती सदर गुन्हा घडल्यापासून काही तासात आरोपींना अटक करून गुन्हे सांगण्याची कामगिरी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक तय्यब मुजावर पीएसआय भोसले हेड कॉन्स्टेबल गजानन माळी विनायक क्षीरसागर एस आय तोडले कॉन्स्टेबल रोकडे पोलीस कॉन्स्टेबल सागर गवळी पोलीस कॉन्स्टेबल आवटी यांच्या पथकाने केली आहे.

## काम बंद आंदोलन....



**बार्टीतील १२०० बाह्यस्त्रोत कर्मचा-यांचे गेल्या १० वर्षांपासून वेतन वाढ करण्यात आली नसुन सातत्याने बार्टी, आणि प्रशासनासोबत पत्रव्यवहार केला आहे. मंत्री महोदय यांनी सुद्धा पगार वाढीचे आश्वासन दिले आहे. परंतु ठोस निर्णय होत नाही त्यामुळे सर्व कर्मचारी आज पासुन काम बंद आंदोलन सुरू केले आहे. आपले सहकार्य अपेक्षित आहे..**

**सोलापूर जिल्हाधिकाऱ्यांचा अभिनव उपक्रम, केवळ क्युआर कोड स्कॅन केल्यास सेकंदात नोंदविली जाते तक्रार**

**आज रोजी पर्यंत क्विक रिस्पॉन्स कोडवर आठ तक्रारी प्राप्त**

# आपले सरकार सेवा केंद्र अथवा सेतू कार्यालयात अधिकचे पैसे मागितल्यास क्यूआर कोड वर तक्रार नोंदवण्याची सुविधा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर, दिनांक १३ (जिमाका):- जिल्ह्यातील नागरिकांना तसेच विद्यार्थ्यांना लागणारे विविध प्रकारचे दाखले उतारे व अन्य प्रमाणपत्रे ऑनलाईन पध्दतीने आपले सरकार सेवा केंद्र अथवा सेतू कार्यालयातून दिले जातात. परंतु बऱ्याचदा आपले सरकार केंद्र अथवा सेतू कार्यालयात विविध दाखले, उतारे व प्रमाणपत्रे काढण्यासाठी आलेल्या सर्वसामान्य नागरिकांना मध्यस्थ व्यक्तीकडून शासनाने विहित केलेल्या रकमेपेक्षा अधिकच्या रक्कमेची मागणी करण्यात येत असल्याची वरिष्ठ अधिकारी वरिष्ठ यांच्याकडे तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत.

त्यामुळे सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सर्वसामान्य नागरिकांना मध्यस्थ व्यक्ती (एजंट) यांच्याकडून पैशाची मागणी होऊ नये अथवा झाल्यास तात्काळ तक्रार करता यावी यासाठी प्रत्येक आपले सरकार सेवा केंद्र अथवा सेतू कार्यालयात दर्शनी भागात क्यू आर (टठ)कोड उपलब्ध करून देण्यात येत आहे, संबंधित नागरिकांनी हा किंवा कोड स्कॅन करून यावर तक्रार नोंदवण्याची सुलभ सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे, यावरील तक्रारीची तात्काळ दखल घेऊन त्यासंबंधी कारवाई करण्यात येणार आहे.


हा क्यु आर कोड सोलापूर जिल्ह्यातील सर्व सीएससी सेंटर तसेच सेतू कार्यालय, तहसील कार्यालय आणि प्रांताधिकाऱ्यांच्या कार्यालयात लावण्यात आले आहेत. यामध्ये केंद्रचालकांनी दाखल्या साठी शासनाने ठरवून दिलेल्या दरापेक्षा अधिकची रक्कम मागणी केल्यास, दाखला विहीत मुदतीत दिला नाही अथवा विलंब केला तर, दाखल्या संदर्भात संबधिताला एसएमएस व्दारे माहिती न दिल्यास, एजंटाव्दारे संबधित नागरिकांकडे अधिकचे पैसे मागणी केल्यास अशा कोणत्याहीप्रकारच्या तक्रारी असल्यास नागरिकांनी यावर दिलेला क्यु आर कोड स्कॅन केल्यास त्यावर तात्काळ आपली तक्रार नोंदविली जाते. तसेच आलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने तातडीने चौकशी करुन पुढील कार्यवाही केली जाते. त्यामुळे नागरिकांना कोणाला भेटण्याची अथवा अधिकचे पैसे देण्याची गरज राहणार नाही. त्यामुळे नागरिकांनी जर असे प्रकार कोठे घडत असतील तर जिल्हा प्रशासनाने क्यू आर कोड स्कॅन करून तक्रार नोंदवणीच्या दिलेल्या अद्यावत सुविधेचा नागरिकांनी लाभ घ्यावा असे, आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले आहे.

> **प्रत्येक आपले सरकार सेवा केंद्र अथवा सेतू, जिल्हाधिकारी कार्यालय, तहसील व प्रांत कार्यालयात दर्शनी भागात क्यूआर कोड लावण्यात आलेला आहे**

**क्यू आर कोड वर आठ तक्रारी प्राप्त–**

हा क्यु आर कोड कोणत्याही मोबाईल पवरून स्कॅन करून नागरिकांना सुलभरित्या तक्रार नोंदविण्याकरिता उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. आज दिनांक १३ फेब्रुवारी २०२५ रोजीपर्यंत एकुण ८ तक्रारी क्यु आर कोड द्वारे नोंदविल्या गेलेल्या आहेत. या तक्रारीमधील १ तक्रारीबाबत अर्जदार यांना कळविणेत आले आहे. उर्वरीत प्रकरणांबाबत चौकशी अहवाल प्राप्त करून तक्रारीत तथ्य आढळून आल्यास कडक कारवाई करण्यात येईल, असे निर्देश जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी सांगितले.

तक्रारींचा तपशिल:- उत्तर सोलापूर, अक्कलकोट, मोहोळ, पंढरपूर, माढा, या तहसिल कार्यालयांकडे प्रत्येकी एक तक्रार अर्ज प्राप्त झाली असून,




तहसिल कार्यालय दक्षिण सोलापूरकडे एक अर्ज प्राप्त झाला असून तक्रार अर्ज हा आपले सरकार सेवा केंद्राच्या सेवाबाबत संबंधित नसल्याने सदरचा तक्रार अर्ज तहसिलदार दक्षिण सोलापूर यांना पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात आला आहे. व तहसिल कार्यालय बार्शी कार्यालयाकडे २ अर्ज असे एकूण आठ अर्ज प्राप्त झाले असल्याचे प्रशासनाच्या वतीने कळविण्यात आले आहे.

## थोडक्यात...

### सराईत गुन्हेगार दोन वर्षासाठी तडीपार

सोलापूर : विविध प्रकारचे गंभीर गुन्हे करणाऱ्या नई जिंदगी येथील सराईत गुन्हेगारास दोन वर्षासाठी सोलापूर व धाराशिव जिल्ह्यातून तडीपार केले आहे. याबाबतचा आदेश पोलीस उपायुक्त (परिमंडळ) विजय कबाडे यांनी दिले आहेत. मतीन म. शरीफ शेख (वय ४३, रा. सिद्धेश्वर नगर भाग ३ नई जिंदगी) असे तडीपार केलेल्या सराईत गुन्हेगाराचे नाव आहे. मतीन शेख याच्याविरुद्ध सन २०१६, २०१७, २०१९ व २०२४ या कालावधीमध्ये सर्वसामान्य नागरिक, व्यापारी यांचा विश्वास संपादन करून जागेचे बनावट कागदपत्रे, वाहनांचे बनावट कागदपत्रे देऊन त्यांची फसवणूक करणे, महिलांना दमदाटी करणे, खंडणी मागून पैसे उकळणे, पैसे न दिल्यास मारहाण करणे यासारखे गंभीर गुन्हे दाखल आहेत. आरोपीमुळे परिसरामधील नागरीक, व्यवसायांमध्ये मोठ्या प्रमाणात दहशतीचे वातावरण होते. त्याच्या वाढत्या गुन्हेगारी कारवायामुळे त्याच्याविरुद्ध तक्रार देण्यासाठी नागरिक धजावत नव्हते. त्यास तडीपार करण्याबाबतचा प्रस्ताव सदर बझार पोलीस ठाणेकडून तयार करून पोलीस उपायुक्त विजय कबाडे (परिमंडळ) यांच्याकडे पाठविला. त्यानंतर कबाडे यांनी प्रस्तावाला मंजुरी देत दोन वर्षासाठी सोलापूर व धाराशिव जिल्ह्यातून तडीपार केली आहे.

# नागरिकांचा अंत पाहू नका, तिलाटी जवळील चारही रेल्वे फाटक बंद करण्यासाठी उपाययोजना करा!

## जिल्हाधिकाऱ्यांची सिमेंट कंपनी अधिकाऱ्यांना सूचना; आमदार सुभाष देशमुख यांनी घेतली संबंधित विभागप्रमुखांची बैठक





**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

सोलापूर- दक्षिण सोलापूर तालुक्यातील तिलाटी स्टेशन ते होटगी स्टेशन दरम्यान असलेले सिमेंट फॅक्टरीचे चारही रेल्वे फाटक लवकरात लवकर बंद करण्यासाठी तात्काळ उपाययोजना करण्याचे आदेश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. नागरिकांचा अंत पाहू नका, तात्काळ पर्यायी उपाययोजना शोधून ब्रिज व उड्डाणपूल बांधण्यासाठी कार्यवाही करण्याचेही आदेश ही त्यांनी यावेळी अधिकाऱ्यांना दिले.

शुक्रवारी, आमदार सुभाष देशमुख यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग, रेल्वे प्रशासन आणि अल्ट्राटेक सिमेंट कंपनी, झुयारी सिमेंट कंपनी तसेच चेट्टीनाड सिमेंट कंपनीच्या अधिकाऱ्यांची संयुक्तपणे बैठक जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या समवेत जिल्हाधिकारी कार्यालय येथे बोलावली. यावेळी आमदार सुभाष देशमुख यांनी रेल्वे फाटक सतत बंद करत असल्यामुळे नागरिकांना होणाऱ्या त्रासा संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना माहिती दिली. यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाचे ठाकरे, रेल्वे प्रशासनाचे अधिकारी तसेच होटगीचे सरपंच अतुल गायकवाड, इंगळगीचे सरपंच विनोद बनसोडे, राहुल वंजारे, प्रधान गुरव, सागर धुळवे यांच्यासह तालुक्यातील नागरिक उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी यासंदर्भातील सर्व माहिती जाणून घेऊन नागरिकांना होणाऱ्या त्रासाबद्दल कशी सुटका होईल आणि कायमस्वरूपी गेट हटवण्यासंदर्भात सिमेंट कंपन्यांनी उपाययोजना करावे, असे सांगितले. अल्ट्राटेक सिमेंट कंपनीने गेट बंद करण्यासंदर्भात उपाययोजना केल्याचे सांगितले. झूयारी आणि चेट्टीनाड सिमेंट कंपन्यांच्या अधिकाऱ्यांना देखील या संदर्भात उपायोजना करण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या.

## पंढरीमध्ये मनसेच्या वतीने भारत भालके यांची जयंती साजरी, मातोश्री वृद्धाश्रमातील वृद्धांना मिष्टांन्न भोजन



**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर तालुक्याची लोकनेते स्वर्गीय आमदार भारत नाना भालके यांच्या ६५ व्या जयंती विविध सामाजिक उपक्रम आणि साजरी केली जात आहे. जयंतीचे औचित्य साधून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते दिलीप बापू धोत्रे यांच्या वतीने गोपाळपूर येथील मातोश्री बुद्धाश्रमातील वृद्धांना मिशन भोजन देण्यात आले.

याप्रसंगी बोलताना दिलीप धोत्रे म्हणाले की गोरगरीब असामान्य नागरिकांसाठी भारत नानाजी कार्य मोठे आहे व त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून त्यांचा पाईक म्हणून पुढील काळात भारतमनाचे स्वप्न साकार करण्यासाठी पंढरपूर शहर व तालुक्यातील नागरिकांना व शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी काम केले जाईल असे अभिवचन देत. दिलीप धोत्रे यांनी जयंती निमित्त शहर व तालुक्यातील जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी माझे कार्यालय सदैव खुले राहील येणाऱ्या जनतेला मदत करण्याचे काम केले जाईल असा संकल्प दिलीप धोत्रे यांनी केला यावेळी कोळी समाजाची ज्येष्ठ नेते अरुण भाऊ कोळी मनसेचे तालुका अध्यक्ष शशिकांत पाटील एडवोकेट संदीप ननवरे, मनसेचे गणेश पिंपळनेर, दत्ता वेलेकर, आदिनाथ भोसले, प्रदीप प्रचांडे, सुरज देवकर, आकाश बंदपट्टे, ओंकार पिसे, अनिल सपताळ, आधी मनसेचे कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.

## गुरूदत्त कारखान्याचे एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर राहुल दादा घाटगे यांच्या वाढदिवसानिमित्त टाकळीवाडी येथे भव्य रक्तदान शिबीर




**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

टाकळीवाडी/प्रतिनिधी : टाकळीवाडी तालुका शिरा-ेळ येथील श्री गुरुदत्त शुगर्स लि.टाकळीवाडी एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर राहुल दादा घाटगे यांच्या वाढदिवसानिमित्त विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक टाकळीवाडी येथे मोठ्या उत्साहात रक्तदान शिबिर व आरोग्य शिबीर संपन्न झाला. एकूण १३८ जणांनी रक्तदान केले. व २०० नागरिकांची आरोग्य तपासणी झाली. अनिल कांबळे ( बापु) ,रामचंद्र बेडक्याळे (भेय्या) , निशांत गोरे, राहुल गोरे, विजय पाटील युवासेना शहर प्रमुख रेंदाळ यांच्या स्वखर्चाने व संयुक्त विद्यमाने भव्य रक्तदान शिबीर व मोफत आरोग्य तपासणी आयोजित केले होते. यावेळी सेवासदन व निरामय हॉस्पिटलचे डॉ रोहन कांबळे , डॉ रजत कांबळे व त्यांचे सहकारी यांचे सहकार्य लाभले.यावेळी उपस्थित गुरूदत्त कारखान्याचे सि.ओ.अतुल पोवार, डेपोटी शेती अधिकारी कुलभूषण गाडवे, डिशलेरी मॅनेजर शिवराज पाटील,खुशाल कांबळे, रमेश निर्मळे, केदबा कांबळे व गुरूदत्त कारखान्याचे कर्मचारी, कामगार व गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कांगोरीगड विकास मंडळ आयोजित शिवजयंती उत्सवाचे आयोजन

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**



रायगड/केतन भोज : कित्येक वर्षे दुर्लक्षित असलेला रायगड जिल्ह्यातील शिवकालीन कांगोरीगडावर प्रथमच यावर्षी शिवजयंती उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.या दुर्लक्षित कांगोरीगडाचा सर्वांगीण विकास व्हावा,यासाठी स्थानिक शिवभक्त गावकरी एकवटले असून त्यासर्वांनी स्व:खर्चातून व स्वतः परिश्रम करून पुढे येऊन पडझड झालेल्या कांगोरी गडाला सावरण्यासाठी हातभार लावला आणि सर्व तेथील बांधकाम पुनर्जीवित करण्यासाठी तसेच गडावर लाईट व इतर सुविधा स्थानिक शिवभक्त यांनी पुढाकार घेऊन उपलब्ध केल्या.आणि या गडाचा विकास करत आहेत.या दुर्लक्षित कांगोरी गडाचा शिवकालीन इतिहास सर्व शिवभक्तांपर्यंत पोहचावा यासाठी प्रथमच कांगोरीगड विकास मंडळ आयोजित बुधवार दि.१९ फ ेब्रुवारी रोजी शिवजयंती सोहळा उत्सवाचे आयोजन कांगोरीगड (मंगळगड)येथे करण्यात आले आहे.

यावेळी जननी आई गावदेवी मंदिर ते कांगोरीगड(सकाळी ६: ३०ते ८.००) यावेळेत पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून नंतर (सकाळी ८.३०ते९.००)यावेळेत ध्वजारोहण पूजन तद्नंतर(सकाळी ९.००ते १०.००)या वेळेत कांगुरमाल व शिवप्रतिमा पूजन व आरती चे आयोजन करण्यात आले असून पुन्हा(सकाळी ११.००ते१.००)यावेळेत गडभ्रमंती,स्वच्छता मोहीम केली जाणार असूनशेवटी(दुपारी१.३०ते३.००)यावेळेत महाप्रसादचे आयोजन करण्यात आले आहे.अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन कांगोरीगड विकास मंडळ यांच्यावतीने करण्यात आले आहे.तरी सर्व समाजातील शिवप्रेमींनी या शिवजयंती सोहळ्यास उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहन आयोजक कांगोरीगड विकास मंडळ मु. सडे, ता. पोलादपूर, जिल्हा रायगड यांच्यावतीने करण्यात आले आहे.

## कारला येथे वार्षीक स्नेहसंमेहन उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा प्रतिनिधी/अमर जाधव : कारला ग्रामपंचायत व शालेय समिती च्या वतिने कारला गावातील नवरत्नाचा सन्मान सोहळा साजरा करण्यात आला.




औसा तालुक्यातील कारला येथील जिल्हा परीषद प्राथमिक शाळेत वार्षीक स्नेहसंमेलन साजरा करण्यात आला ,जिल्हा परीषद शाळेतील लहान लहान चिमुकल्या विद्यार्थ्यांनी आपल्या नृत्याचे सादरीकरण करताना उपस्थीतांची मने जिंकली ,कारला ग्रामपंचायत व शालेय समितीच्या वतिने कारला गावातील नवरत्नांचा सन्मान व सत्कार सोहळा साजरा करण्यात आला.

यावेळी कारला गावचे सुपुत्र तथा सुप्रसिद्ध उद्योजक नरेंद्र रामराव काळे महावितरणचे कार्यकारी अभियंता प्रमोद वामनराव क्षिरसागर बांधकाम अभियंता ओम प्रकाश गहिनीनाथ काळे सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक हनुमंत विठ्ठलराव शिंदे ज्ञानेश्वर रामराव काळे बालाजी सोनटक्के इंद्रजीत श्रीकांत निकम तलाठी विजयकुमार ऊस्तुरे ग्रामसेवक गिरी , दिनकर रामराव काळे, वल्ड रेकॉर्ड करणारी सृष्टी जगताप कारला गावचे सरपंच अलकाताई सुरेश पवार उपसरपंच किशोर काळे श्री संत मारुती महाराज सहकारी साखर कारखान्याचे संचालक विलास काळे शालेय समितीचे अध्यक्ष शिवाजीराव काळे बलभीम कुलकर्णी नागनाथ काळे उमाकांत घोडके,सुरेश पवार ,विश्वास काळे , गोविंद मुगळे बालाजी काळे नागनाथ डफडे कुंडलिक कांबळे,शाम जाधव मुख्याध्यापक माने सर सह शाळेतील शिक्षिका शिक्षक व कारला ग्रामस्थ उपस्थित होते

## दुसर गावच्या सोनिया कागदे यांची महसूल सहाय्यक पदावर निवड

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

**ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी यश!**



पंढरपूर प्रतिनिधी

दसुर तालुका माळशिरस येथील कु. सोनिया शरद कागदे यांनी युद्ध चिकाटी आणि अथक परिश्रमाच्या जोरावर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यश मिळवून महसूल अधिकारी (महसूल सहाय्यक) या पदावर निवड मिळवली आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी हे निश्चितीय प्रेरणादायी ठरणार आहे.

कु. सानिया यांनी सूर्य अभियांत्रिकी महाविद्यालयात पंढरपूर येथून संगणक विज्ञान आणि अभियांत्रिकीची पदवी घेतली व उच्च शिक्षण घेत असताना त्यांनी स्पर्धा परीक्षांची तयारी सुरू केली अभ्यासातील सातत्य कठोर परिश्रम आणि योग्य मार्गदर्शन यांच्या जोरावर त्यांनी हे संपादन केले.

त्यांच्या या यशाबद्दल कायदे परिवार ग्रामस्थ दसूर या व सोरी परिवार यांनी आनंद व्यक्त करत त्यांचे अभिनंदन केले आहे त्यांच्या या यशामुळे गावातील अनेक तरुणांना प्रेरणा मिळणार आहे.

**पत्नी सरपंच निर्णय मात्र पतीचाच**

**ग्रामविकास ठप्प; महिलांचे अधिकार कागदावरच?**

# औसा तालुक्यात महिलाराज पण कारभार मात्र सरपंच पतींचेच!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**


औसा प्रतिनिधी/अमर जाधव

महिला सशक्तीकरणाचा नारा देत अनेक ग्रामपंचायतींमध्ये महिलांना सरपंचपद मिळाले असले, तरी प्रत्यक्षात गावाच्या कारभाराचा असली सूत्रधार मात्र सरपंच पती किंवा कुटुंबातील पुरुषच असल्याचे वास्तव उघडकीस आले आहे. ग्रामीण भागात स्त्रियांना राजकारणात संधी मिळावी म्हणून शासनाने आरक्षण दिले, पण ग्रामसभांपासून निर्णय प्रक्रियेपर्यंत सर्व सत्ता सरपंच पतींच्याच हाती असल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे.

ग्रामसभांमध्ये सरपंच पतींचाच दबदबा!

गावाच्या विकासकामांबाबत चर्चा करण्यासाठी बोलावलेल्या मासिक बैठका किंवा ग्रामसभा असतात - खरंतर त्यात गावच्या अधिकृत सरपंच महिलेने सहभाग घ्यायला हवा. पण प्रत्यक्षात याच सभा सरपंच पतींच्या नेतृत्वाखाली पार पडतात. गावकऱ्यांचे प्रश्न, विकास कामांचे निर्णय, निधीचे वाटप हे सर्व सरपंच पती स्वतःच ठरवतात, तर महिला सरपंचांना केवळ नावापुरते सन्मानाचे पद देण्यात आले आहे.

महिला आरक्षणाचा हेतूच फोल?




महिला सरपंचांच्या हाताात सत्ता देऊन त्यांना सक्षम करण्याचा सरकारचा उद्देश असताना, गावागावांत मात्र महिला केवळ कागदोपत्री सरपंच राहिल्या आहेत. काही गावांमध्ये तर सरपंच महिला ग्रामसभेत हजेरीही लावत नाहीत, आणि त्यांच्या नावाने त्यांच्या पतीच संपूर्ण कारभार पाहतात. हा प्रकार महिला सक्षमीकरणाच्या संकल्पनेलाच हरताळ फासणारा आहे.

ग्रामविकास रखडला - महिला प्रश्न दुर्लक्षित!

सरपंच पतींच्या अती हस्तक्षेपामुळे गावातील महिला आरोग्य, शिक्षण, रोजगार, स्वच्छता यांसारखे विषय दुर्लक्षित राहत आहेत. महिला नेतृत्वाने पुढाकार घेतला असता, तर गावातील महिलांच्या गरजा आणि समस्या अधिक चांगल्या प्रकारे सोडवल्या गेल्या असत्या. मात्र, सरपंच महिला स्वतः निर्णायक भूमिकेत नसल्याने गावविकासात महिला दृष्टिकोनाचा अभाव जाणवत आहे.

**महिला सरपंचांनी खऱ्या अर्थाने नेतृत्व स्वीकारावे!**

**महिला सरपंचांनी स्वतःचा अधिकार प्रस्थापित करून निर्णय प्रक्रियेत सक्रीय सहभाग घ्यायला हवा. गावकऱ्यांच्या प्रश्नांवर त्यांनी थेट उत्तर द्यायला हवे आणि गावाचा कारभार स्वतःच्या नेतृत्वाखाली चालवायला हवा. अन्यथा, महिला सक्षमीकरणाचा हा प्रयोग अपयशी ठरेल, आणि खऱ्या विकासाचे नेतृत्व घडले पाहिजे!**

लोकशाही की घरगुती सत्ता?

ग्रामपंचायतींमध्ये महिला सरपंच असल्या तरी गावाचा कारभार एका घरापुरता सीमित राहात असेल, तर ही लोकशाही म्हणायची की घरगुती सत्ता? हा प्रश्न निर्माण झाला आहे. गावातील विकास योजनांमध्ये महिलांचा सक्रीय सहभाग वाढला तरच खऱ्या अर्थाने स्त्री-सक्षमीकरण शक्य होईल.